वेळ : २.३० तास गुण :७५

प्र.१ अ) 'नाटक' हे इतर साहित्य प्रकारापेक्षा कसे वेगळे आहे ते सांगून नाटकाचे प्रमुख प्रकार लिहा. (१५)

किंवा

ब) 'नाटक' म्हणजे काय ते सांगून नाटक या साहित्य प्रकाराचे स्वरुप स्पष्ट करा.

प्र.२ अ) विजय तेंडुलकरांच्या 'कावळ्यांची शाळा' या नाटकाचे आशयसूत्र स्पष्ट करुन त्या संदर्भात या नाटकाच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा. (१५)

किंवा

ब) एका सामान्य माणसाची एका साध्या ध्येयासाठीची धडपड आणि त्या धडपडीत विघ्न आणणाऱ्या अनंत चमत्कारिक अडचणी यांचे चित्रण 'कावळ्यांची शाळा' या नाटकात कशा प्रकारे केलेले दिसते ? सविस्तर लिहा.

प्र.३ अ) धर्म, भाषा यातील भेदभावांपलिकडे माणसांना एकमेकांप्रती वाटणारी ओढ, आस्था, माणुसकी यांचे महत्त्व 'राहिले दूर घर माझे' या नाटकात कशाप्रकारे अधोरेखित केले आहे, ते साधार लिहा. (१५)

किंवा

ब) 'राहिले दूर घर माझे' या नाटकात सत्ता, फायदा याकरिता तिरस्कार, भेदभाव पेरत राहणाऱ्या शक्ती आणि त्यांच्या या कृतीत होरपळून निघणारी सामान्य माणसे यांचे कशा प्रकारे चित्रण केले आहे, ते सविस्तर लिहा.

प्र.४ टीपा लिहा. (प्रत्येक गटातील एक) (१५)

अ) 'नाटक' एक साहित्य प्रकार

किंवा

नाटकातील संघर्ष

ब) आगरकर व मर्लिन मन्रोची तसबीर

किंवा

'कावळ्यांची शाळा' मधील शांता

क) 'राहिले दूर घर माझे' नाटकातील शीर्षक

किंवा

माईचे 'लाहोर' वरील प्रेम

प्र.५ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पाच (१०)

१. 'कावळ्यांची शाळा' या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचे दिग्दर्शन कोणी केले ?

२. मंगेशच्या मित्राचे नाव काय ?

OP10ABF

४. शांताची भूमिका कोणी केली होती ?

५. कासीम - हमीदाच्या मुलाचे आणि मुलीचे नाव लिहा.

६. रतनलाल कोणाला शोधायला बाहेर पडतो आणि परत येत नाही.

७. माईचा काटा काढण्यासाठी उस्ताद जावेदकडे किती रक्कम मागतो ?

८. माईला रागाच्या भरात पाकिस्तानातून चालती होण्यास कोण सांगतो ?

ब) रिकाम्या जागा भरा. (५)

१. ............... हा नाटकाचा मूळ घटक आहे.

२. कथानकाचे ........, ......... आणि .......... असे तीन भाग कल्पितात.

३. उत्कर्षबिंदूत मुख्यत: ............... असतो.

४. विचारवस्तू म्हणजे ............... अनुभव होय.

५. ............... हा माणसाच्या अटळ दु:खाचे चित्रण करणारा नाट्यप्रकार आहे.

❀❀❀